जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०७.०१.२०२६**

''महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२६ करीता ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या पुर्वतयारीबाबत. ''

आगामी ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूक - २०२६ च्या अनुषंगाने दिनांक १५/०१/२०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. सदर मतदान प्रक्रिया सूरळीत व निर्विघ्नपणे पार पडण्याच्या दृष्टीने तसेच कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून सर्वतोपरी चोख व्यवस्था करण्यात आलेली आहे.

प्रतिबंधक कारवाई :-

सदरची मतदान प्रक्रीया सुरळीत पार पाडावी यादृष्टीने ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील सराईत गुन्हेगारांवर दिनांक ०१/०१/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५ व आज पावेतो खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

अ) एम.पी.डी.ए कायदयान्वये स्थानबध्द करण्यात आलेल्या एकुण कारवाई :- ४९

ब) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२४ कलम १२६,१२८ व १२९ अन्वये कारवाई :- ११५०८

क) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५५,५६ व ५७ अन्वये हद्दपार कारवाई :- ३०७

ड) महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ९३ अन्वये कारवाई :- ५५८

नाकाबंदी दरम्यान केलेली कारवाई :-

या व्यतिरीक्त स्थानिक पोलीस व निवडणूकीसाठी स्थापन करण्यात आलेले एस.एस. टी/एफ.एस.टी पथकामार्फत आचारसंहिता सुरू झाल्यापासून आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळया ठिकाणी नाकाबंदी करण्यात आलेली असुन सदर नाकाबंदीच्या काळामध्ये एकुण २,१६,८९,०००/-रू (दोन कोटी सोळा लाख एकोनव्वद हजार) इतकी बेहिशोबी रोख रक्कम जप्त करण्यात आलेली आहे.

शस्त्रे जप्ती कारवाई :-

ठाणे पोलीस आयुक्तालयात कोंबींग ऑपरेशन व ऑपरेशन ऑल आऊट राबवून आतापर्यत २७ अग्निशस्त्रे, ३७ जिवंत काडतूसे आणि १४२ चाकू/सुरे अशी हत्यारे जप्त करून संबंधीतांवर कडक कायदेशिर कारवाई करण्यात आलेली आहे. या व्यक्तीरीक्त ठाणे पोलीस आयुक्तालयातील ३७६० मंजूर शस्त्र परवान्यापैकी ३०६९ शस्त्र जमा करण्यात आलेली आहेत.

बेकायदेशिर दारू/अंमली पदार्थ/ जप्ती कारवाई :-

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सुमारे १३२१५ लिटर बेकायदेशिर देशी/विदेशी व गावठी दारू किंमत सुमारे १०,९२,४६५/-रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच अंमली पदार्थाबाबत संपुर्ण आयुक्तालयात २९१९ गुन्हे दाखल असुन त्यामध्ये एकुण ३१४४ आरोपीवर कारवाई करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयांमध्ये सुमारे १४९१ किलो ग्राम

गांजा,एम.डी, चरस, कोकेन, हेरॉइन इत्यादी अंमली पदार्थ किंमत सुमारे ७८,३५,६०,४५८ (अठ्ठ्यात्तर कोटी पस्तीस लाख साठ हजार चारशे अठ्ठावन्न)चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

याव्यतिरीक्त आचारसंहितेचा भंग होणार नाही यादृष्टीने सतत लक्ष रहावे म्हणुन संपूर्ण पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रामधील प्रत्येक पोलीस ठाण्याकडून जास्तीत जास्त ड्रोन कॅमेराव्दारे निगराणी ठेवण्यात येत असून मतदानाच्या दिवशी ती अधिक परिणामकारक करण्यात येणार आहे. तसेच ठाणे आयुक्तालय परिसरातील रेकॉर्ड वरील सर्व गुन्हेगार यांची दैनंदिन तपासणी करून त्यांच्या गुन्हेगारी प्रवृतीला आळा घालण्यात येत आहे. सर्व पोलीस ठाणे हद्दीतील तणावग्रस्त विभागामध्ये स्थानिक पोलीसांच्या मदतीने रूट मार्च चे आयोजन करून एरीया डॉमीनेशन करण्यात येत आहे व सदर निवडणूकीत कायदा व सुव्यवस्थेची कोणतीही परिस्थिती हाताळण्यास पोलीसदल सक्षम असल्या बाबत सामान्य नागरीकांना आश्वासित करण्यात येत आहे.

दिनांक १५/०१/२०२६ रोजीच्या होणाऱ्या महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ मधील मतदान प्रक्रीया सुरळीत पार पाडावी या दृष्टीने सर्वतोपरी उपाययोजना करण्यात आली असून पोलीस यंत्रणा सर्वतोपरी सुसज्ज आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर